दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.१५ फेब्रुवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १७१ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 15 Feburary 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 171 | Pages 4 | Rate 4 Rs




# केज नगरपंचायत मध्ये ३ कोटी ६२ लाखांचा घरकुल महाघोटाळा

## दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करा

## आमदार नमिता मुंदडा आक्रमक उपमुख्यमंत्री आणि नगरविकास सचिवाकडे पत्राद्वारे चौकशीची मागणी

दैनिक वादळ वार्ता । केज (प्रतिनिधी)-केज नगरपंचायत मध्ये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आलेल्या निधीत तब्बल ३ कोटी ६२ लाख रुपयांचा मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे उघड झाले आहे या प्रकरणाची गंभीर दखल घेत केज विधानसभा मतदारसंघा च्याआमदार नमिता मुंदडा यांनी दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी राज्य सरकारकडे केली आहे.आमदार मुंदडा यांनी २ फेब्रुवारी रोजी उप मुख्यमंत्री,नगरविकास सचिव,विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून या प्रकरणाची विशेष समितीमार्फत चौकशी करण्याची आणि गैरव्यवहार झालेली रक्कम व्याजासह वसूल करण्याची आक्रमक मागणी केली आहे.

### तपासणी अहवालातून भ्रष्टाचार उघड

लेखापाल,वित्त निरीक्षक आणि म्हाडा (MHADA) यांच्या तपासणी अहवाला तून हा गंभीर स्वरूपाचा भ्रष्टाचार प्राथमिकदृष्ट्या स्पष्ट झाला आहे. नियमानुसार,प्रधानमंत्री आवास योजनेच्या 'बीएलसी' घटकातील निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होणे अपेक्षित होते.मात्र,केंद्र व राज्य सरकारचा हा निधी नियमांचे उल्लंघन करून इतर अनधिकृत कामांसाठी वळवण्यात आला आहे.

### महत्त्वाच्या फाईल्स आणि रेकॉर्ड 'गायब'

या घोटाळ्याचे गांभीर्य अधिक वाढले आहे कारण या व्यवहाराशी संबंधित महत्त्वाच्या लेखा संचिका,देयके,व्हाउचर आणि नोंदी कार्यालयातून गहाळ झाल्याचे निष्पन्न झाले आहे.पुरावे नष्ट करण्यासाठीच जाणीव पूर्वक फाईल्स गायब केल्याचा संशय व्यक्त केला जात असून,यामुळे या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असल्याचे दिसून येते.

### घोटाळ्याचे मुख्य मुद्दे

निधीचा अपहार ३ कोटी ६२ लाखांचा निधी गरिबांच्या घराऐवजी इतरत्र खर्च,नियमांचे उल्लंघन 'एम एन ए' झिरो बॅलन्स खात्यातील निधी परत न करता अन्य कामांसाठी वापरला,पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न, संचिका आणि व्हाउचर नगर पंचायत कार्यालया तून गायब,प्रशासकीय निष्काळजीपणा, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे थेट उल्लंघन,

प्रशासनाच्या भूमिकेकडे तालुक्याचे लक्ष आमदार नमिता मुंदडा यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे केज नगरपंचायतीत खळबळ उडाली आहे. आता या भ्रष्टाचार प्रकरणी राज्य शासन आणि जिल्हा प्रशासन नेमकी काय कारवाई करते आणि दोषींना जेलची हवा लागते का? याकडे संपूर्ण केज तालुक्याचे लक्ष लागले आहे.




### जनतेच्या विश्वासाला तडा

प्रधानमंत्री आवासयोजना ही गोरगरीब जनतेला हक्काचे घर मिळवून देणारी अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे.मात्र,केज मध्ये झालेल्या या भ्रष्टाचारा मुळे योजनेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून जनतेचा शासनावरील विश्वासाला तडा गेला आहे.सार्वजनिक निधीचा अपहार कदापिही सहन केला जाणार नाही.या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करून गोरगरीब लाभार्थ्यांना न्याय मिळवून देणार.

– नमिता मुंदडा आमदार,
केज विधानसभा



# परळी वैजनाथ न.प.च्या डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झालं लोकार्पण

## ना पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते फीत कापून इमारतीचे उद्घाटन



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ शहराच्या शैक्षणिक व सांस्कृतिक इतिहासात मोलाची भर घालणाऱ्या डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाच्या नवनिर्माण करण्यात आलेल्या अत्याधुनिक शानदार इमारतीचे लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते दुरुसस्थ लोकार्पण करण्यात आले. तर राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे आणि आ . धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते प्रत्यक्ष वाचनालयाच्या इमारतीचे फीत कापून व श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले.

नगरपरिषद परळी वैजनाथ च्या वतीने महत्त्वकांक्षी प्रकल्प म्हणून भव्य दिव्य डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाची इमारत उभी करण्यात आली आहे. डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाकडे सध्या चाळीस हजाराहून अधिक पुस्तकांची समृद्ध ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. नव्या इमारतीत निर्माण करण्यात आलेल्या ग्रंथालयात एक लाखापेक्षा अधिक ग्रंथसंपदा उपलब्ध करून दिली जाणार आहे. केवळ ग्रंथालयापुरते मर्यादित न राहता ही वास्तू आता बहुउद्देशीय ज्ञानवास्तू ठरली आहे. यामध्ये आधुनिक व नव्या तंत्रज्ञानाची जोड देत बहुमजली इमारतीत विविध कक्षांची रचना करण्यात आली आहे. प्रशस्त व शांत वाचनकक्ष, डिजिटल लायब्ररी हाय स्पीड इंटरनेट सुविधा स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यास विभाग, बालवाचन विभाग, सुसज्ज कॉन्फरन्स हॉल कलादालन, दिव्यांग स्नेही रॅम, बुद्धिबळ मार्गदर्शन केंद्र, आर्टिफिशियल लॅब, मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिका कक्ष आदि दालनांची निर्मिती करण्यात आली आहे.

# महिला सरपंच पतीला सोशल मीडियावर शिवीगाळ करणाऱ्या विरुद्ध अट्रॉसिटीचा गून्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जीवाचीवाडी येथील अनुसूचित जातीच्या महिला सरपंच प्रेरणा काळे यांचे पती दीपक काळे यांना गावातीलच एकाने सोशल मीडियावर अश्लील आणि जाती वाचक शिवीगाळ केल्या प्रकरणी आरोपी विरुद्ध केज पोलिसात अट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला आहे.या बाबत सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील अनुसूचित जातीच्या महिला सरपंच प्रेरणा काळे यांचे पती दीपक रामभाऊ काळे आणि बंडू नारायण चौरे हे दोघे वॉट्सअप च्या




सन २०२२ -२३ इलेक्शन टीम या नावाच्या वॉटसअप ग्रुपमध्ये सहभागी आहेत. या ग्रुपवर बंडू चौरे याने दीपक काळे यांना अनेकदा अश्लील भाषेत शिवीगाळ केली.त्याच बरोबर जातीवाचक शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली.त्यामूळे बुधवार,दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री दीपक काळे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून बंडू चौरे याच्याविरुद्ध केज पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला आहे.प्रभारी सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे हे पुढील तपास करीत आहेत.दरम्यान या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे.

# अंबाजोगाई येथे तीन दिवसीय विशेष वसुली अधिकारी प्रशिक्षण वर्ग संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर,जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड,यांचे विद्यमाने अर्थवेल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अंबाजोगाई यांचे सहकार्याने अंबाजोगाई येथे नागरी सहकारी बँका, पतसंस्था करिता विशेष वसुली अधिकारी तीन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले.तीन दिवसीय प्रशिक्षण वर्गात बीड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील अभ्यासू तज्ञ व्याख्याते श्री.खोडसे सी. ए.प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड यांनी कर्ज वसुली संदर्भात १०१ कायदेशीर प्रकरणे,कर्ज वाटप करत असताना घ्यावयाची वैधानिक दक्षता,भविष्यात संस्था




अडचणीत येणार नाही याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले तसेच वसुंधरा महिला नागरी सहकारी बँकेचे सीईओ जे.एस.शर्मा सहकार क्षेत्रातील कायदेशीर बाबी,नियम,कायदा, सविस्तर मार्गदर्शन केले, सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे उपप्राचार्य एस. आर.कोळे यांनी सहकार कायदा,नियम या विषया वर सखोल मार्गदर्शन केले.समारोप समारंभास अर्थवेल नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक बाळासाहेब माने होते. उपस्थितांचे स्वागत व्यवस्थापक अंगद मस्के यांनी केले,कार्यक्रमाचे प्रस्ताविक सूत्रसंचालन आभार वर्ग संयोजक एस. आर.कोळी यांनी केले.

# संपादकीय

## नद्यांचे आरोग्य बिघडलेय!

महाराष्ट्रात पश्चिम घाटमाथ्यावर तीन नद्यांची खोरी आहेत – कृष्णा, गोदावरी आणि तापी. यापैकी कृष्णा आणि गोदावरी पूर्ववाहिनी आहेत, तर तापी पश्चिमवाहिनी आहे. पश्चिम घाटाच्या पूर्वेला कोकणात पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्यांचे जाळे आहे. महाराष्ट्रातल्या या सर्वच नद्या आज संकटात आहेत.केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या एका अहवालानुसार नद्यांमधील प्रदूषणाबाबतीत महाराष्ट्र राज्य भारतात आघाडीवर आहे. यापैकी सर्वाधिक प्रदूषित म्हणजे ठाणे जिल्ह्यातील काळू आणि मुंबईतील मिठी. मिठी ही भारतातील सर्वांत प्रदूषित नदी आहे. त्या खालोखाल प्रदूषित नद्या म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील भीमा आणि पुणे जिल्ह्यातील मुळा, मुळा-मुठा आणि पवना. नद्यांमधील प्रदूषणाचा शहरीकरण आणि औद्योगीकरणाशी थेट संबंध आहेच, पण शेतीत होणाऱ्या रसायनांच्या अतिरेकी वापरामुळे ग्रामीण भागातील नद्याही प्रदूषित झालेल्या आहेत. गेल्या काही वर्षांत अतिप्रदूषित नद्यांच्या संख्येत घट झाली, पण सौम्य स्वरूपाचे प्रदूषण असलेल्या प्रवाहांच्या संख्येत वाढही झाली.मानवी हस्तक्षेपामुळे पाण्यात मिसळलेले जैविक (उदा. प्रक्रिया न करता नदीत सोडलेले मैलापाणी), रासायनिक (उदा. अतिरिक्त खते व तण आणि कीटक नाशके), आणि भौतिक (उदा. धूप होऊन पाण्यात गेलेले मातीचे व रेतीचे कण) पदार्थ अशी प्रदूषणाची ढोबळ व्याख्या करता येईल.मानवी हस्तक्षेपामुळे पाण्यात अनेक घातक जीवाणूंचे प्रमाण वाढते आहे. प्रतिजैवकांच्या अतिवापरामुळे हे जीवाणू आता महाघातक (सुपरबग) झालेले आहेत. यांच्यामुळे अनेक जीवघेण्या किंवा आरोग्यावर दूरगामी दुष्परिणाम करणाऱ्या रोगांच्या साथी वारंवार येतात. औद्योगिक प्रदूषणही प्रक्रिया न करता जवळच्या ओढ्यात नाहीतर नदीत सोडण्याच्या प्रमाणात वाढ होते आहे. यातून शिसे, पारा, व इतर मानवी आरोग्यासाठी धोकादायक पदार्थ नद्यांच्या पाण्यात येत आहेत. घनकचरा व्यवस्थापन योग्य होत नसल्याने हा कचराही नदीपात्रांत येतो. विशेषतः प्लास्टिक प्रदूषण नियंत्रणाच्या बाहेर गेल्यामुळे नद्यांच्या पाण्यात प्लास्टिकचे सूक्ष्म कण मिसळत आहेत. यांचे विघटन होण्यास हजारो वर्षे लागू शकतात, आणि पाणी शुद्धीकरणासाठी केल्या जाणाऱ्या प्रक्रियांना हे दाद देत नाहीत. पिण्याच्या पाण्यावाटे हे सूक्ष्म कण आपल्या सगळ्यांच्या शरीरांमध्ये येऊन बसले आहेत. याचे आरोग्यावर नेमके काय परिणाम होतात, हे आपल्याला अजून पुरते कळलेलेही नाही. जीवनशैलीतील बदलांमुळे आपल्या दैनंदिन जीवनातही घातक रसायनांचा वापर वाढला आहे. ही रसायनेही पाण्याच्या प्रदूषणाला कारणीभूत ठरतात.प्रदूषण मोजताना मात्र या सर्व घटकांचे मापन होतेच असे नाही. पाण्यात विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण (डिझॉल्व्हड ऑक्सिजन) व पाण्याचे नैसर्गिक रित्या शुद्धीकरण करण्यासाठी आवश्यक ऑक्सिजनची मागणी (बायोकेमिकल व केमिकल ऑक्सिजन डिमांड – बीओडी आणि सीओडी) यांच्या मापनावर सर्वसाधारणतः जास्त भर असतो. त्यामुळे वेगवेगळ्या नद्यांच्या वेगवेगळ्या भागांत प्रत्यक्षात प्रदूषणाची स्थिती काय आहे, व काळाबरोबर कशी बदलत गेली आहे याची पूर्ण माहिती उपलब्ध नाही. तरीही महाराष्ट्रातील नद्यांमधील प्रदूषणाची पातळी भारतात सर्वाधिक दिसते, याचा अर्थ प्रत्यक्षात कितीतरी अधिक गंभीर परिस्थिती आहे. जमिनीवर वाहत्या पाण्यात जसे प्रदूषण होते, तसेच ते भूजलातही होते, पण त्याचे व्यापक मापन व विश्लेषण होतच नाही. म्हणजेच भूजलाच्या प्रदूषणाची व्याप्ती तर अजिबातच कळलेलीही नाही.शेतीमध्ये वापरलेली अतिरिक्त रसायने नद्या आणि भूजलामध्ये जात आहेत, यावर या रसायनांचा वापरच कमी करणे किंवा टाळणे हाच एकमेव उपाय आहे. शहरी व औद्योगिक सांडपाण्यावर शुद्धीकरणाची प्रक्रिया करून मगच उरलेले तुलनेने स्वच्छ पाणी नद्यांमध्ये सोडले जायला हवे. विशेषतः उद्योग-व्यवसायांसाठी तर हे कायद्याने बंधनकारकच आहे. पण प्रदूषण मंडळांतील व कारखान्यांमधील अधिकाऱ्यांची भ्रष्ट युती हा यातला सर्वांत मोठा अडसर आहे. घरगुती सांडपाण्याचे शुद्धीकरण हा विषय ग्रामीण भागात माहीतच नाही, आणि महाराष्ट्रातील शहरे इतक्या झपाट्याने वाढत आहेत, की कोणत्याही शहरातील सांडपाणी शुद्धीकरणाची क्षमता ३०-४० टक्केच आहे. म्हणजेच गावांमधील सर्व सांडपाणी आणि शहरांमधील एकूण सांडपाण्यापैकी ६०-७० टक्के हे जवळच्या पाण्याच्या प्रवाहात जात आहे. सर्वच ठिकाणी सांडपाणी शुद्धीकरणाची क्षमता झपाट्याने वाढवणे आणि कायद्यांची व नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे तातडीने आवश्यक आहे.यात आणखीही दोन समस्या आहेत. एक म्हणजे महाराष्ट्रातल्या नद्यांवर (विशेषतः कृष्णेच्या खोऱ्यात) भारताच्या इतर कोणत्याही राज्याच्या तुलनेत सर्वाधिक धरणे बांधली गेली आहेत. धरणांमुळे पाण्याचा प्रवाह आटतो, आणि धरणाच्या पुढील नदीपात्र कोरडे पडते. यातच सांडपाणी येत राहते. शुद्ध पाण्याचा प्रवाह थांबतो, आणि नदीपात्रात अशुद्ध पाणी वाहू लागते. दुसरे म्हणजे शहरांमध्ये जी काही थोडीफार सांडपाणी शुद्धीकरणाची यंत्रणा आहे, त्यातून बाहेर पडणारे पाणीही सर्वार्थाने शुद्ध असतेच असे नाही. महापालिका सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभी करताना उपलब्ध जागा आणि निधीनुसार नियोजन करतात. वेगवेगळ्या प्रकारची प्रदूषके बाजूला काढण्यासाठी वेगवेगळ्या प्रक्रियांची, तंत्रज्ञानाची गरज असते, त्या सर्वांची पूर्तता होतेच असे नाही.गेल्या दशकभरात जागतिक वातावरण बदलामुळे अतिवृष्टी किंवा ढगफुटीसारख्या घटनांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे. प्रत्येक महिन्यात पडणाऱ्या पावसाचे प्रमाणही बदलते आहे. यामुळे धरणांचे व्यवस्थापन आव्हानात्मक बनले आहे. साधारण मे महिन्याच्या अखेरीपर्यंत बहुतेक सर्व धरणांमधले वापरण्याजोगे पाणी संपत येते. पाऊस सुरू झाल्यावर प्रत्येक महिन्यात काही टक्के पाणी साठवत पावसाळा संपेपर्यंत धरणे पूर्ण भरतील असे नियोजन करणे अपेक्षित असते. पण यात काही अडसर असतात. उदा. स्थानिक राजकारण्यांना जुलै-ऑगस्टपर्यंतच धरण १०० टक्के भरावे, म्हणजे वर्षभरासाठी पाणी मिळण्याची खात्री जनतेला लगेच देता येईल असे वाटते. गणपती विसर्जनासाठी धरणातून पाणी सोडून नद्या तात्पुरत्या प्रवाही करणे ही एक स्थानिक सांस्कृतिक गरज असते. ही सारी दडपणे आणि पावसाची वाढलेली अनिश्चितता यांमुळे बरेचदा धरणे वेळेआधी भरतात, आणि मग अतिवृष्टी झाल्याने पाणी सोडून द्यावे लागते व पूर येतात. म्हणजेच धरणांनी पूरनियंत्रण होण्याऐवजी पुरांना हातभार लागतो आहे. लोकसंख्यावाढीच्या रेट्यामुळे शेतीपासून घरांपर्यंत अनेक गोष्टी नद्यांच्या पूरक्षेत्रात उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे पूर आला की स्वाभाविकच मोठे नुकसान होते.याशिवाय स्थानिक परिस्थितीमुळेही काही ठिकाणी आव्हाने निर्माण झाली आहेत. गोदावरी नदीचे खोरे हा तुलनेने कमी पावसाचा भाग आहे. पण बदललेल्या पर्जन्यचक्रामुळे गोदावरीच्या उपनद्यांना आता पूर येतात. इथल्या स्थानिक लोकांमध्ये पुराला तोंड देण्याचे पारंपरिक सामूहिक ज्ञान नसल्याने जास्त नुकसान होते. दुसरीकडे तापी नदीच्या खोऱ्यात गेल्या काही वर्षांत खाणकामांचे प्रमाण वाढल्यामुळे पावसाच्या पाण्याबरोबर नद्यांच्या पात्रांत मोठ्या प्रमाणावर वाळू आणि रेती येते आहे. परिणामी नद्यांमधली जैविक परिसंस्था तर कोलमडून पडतेच आहे, पण नद्यांची पात्रे उथळ होत आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पुराच्या पाण्याबरोबर शेतांमध्ये रेती येते आहे आणि पावसाळ्यानंतर पाणीटंचाईला तोंड द्यावे लागते आहे.

# याहा मोगी पुजन म्हणजे हजारो वर्षांपूर्वी आदिवासी जमातीनी शोधलेला शेती महोत्सव

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

आदिवासी समाज पुर्वीपासुन निसर्गाला देव मानुन सण उत्सवाचे पुजन करत आला आहे निलीचारी, वागदेव, गव्हाणपुजन,(ओखडा), गांवदिवाळी,कणी (धान्य)पुजन,ओलीजोगण (होळी)इत्यादी सण-उत्सव निसर्गाचे प्रतिक असुन वास्तविक देव असून निसर्गातील ज्या -ज्या वस्तू प्रत्यक्षात जीवनात उपयोगी आले त्या -त्या वस्तुला देव मानुन पुजन करत असतात.पुर्वीच्या काळापासून आदिवासींच्या अलिखीत परंतु मौखिक परंपरा आजही चालत आली आहे.आदिवासी समाजात
कोणताही सण उत्सव वर्षातुन एकदाच केला जातो. वर्षातुन होणारे सण उत्सव अबाधीत ठेवून मौखिक परंपरा जतन करण्याचे कार्य आदिवासी समाजातील पुजारा, बोडवा, मोडवी(आदिवासी इतिहासकार ) यानी आदिवासी सांस्कृतिक रितीरिवाज जतन करून ठेवले आहे.

दाब मंडळातील धरती वरील पहिले पंच :-१५हजार वर्षांपूर्वी लोक जंगलात समुहाने फिरून भटके जीवन जगुन काढत होते. समुहाने भटकंती करून जंगलातील कंदमुळे,फळफुल इत्यादी खाऊन गुजराण करायचे. तेव्हा दाब मंडळातील प्रमुख कोलपासा,गोर्याकोठार,देवगोंदारी,विन्यादेव,राजापांठा,तारहामहल,उमरावाणू ,हेलबदेव,आगीपांडर,गिंबदेव यानी अथक परिश्रम करून जंगलातील सर्व प्रकारचे धान्य एकत्र गोळा करून त्यामधुन लोकांच्या उपयोगी येईल असे धान्य वेगळे केले.त्यानंतर ते धान्य दाब येथे सामुहिक शेती करून बी-बियाणे म्हणून कोठार भरून ठेवले. त्यानंतर या भुमीवर भटके जीवन व कंदमुळे खाऊन जीवन जगणार्या लोकांना बी-बियाणे कसे साठवून ठेवायचे, अन्न कसे शिजवुन खायचे,शेती कशी करायची,या भुमीवर व्यवहारी जीवन कसे जगायचे, रितीरिवाज व्यवहार शिकवले.जे या लोकांना हे सर्व ज्ञान माहिती नव्हते. त्यांच्या या महान शोधाच्या कारणांमुळे लोक त्याना देव समान पुजायला लागले.त्याना आपल्या कुळ सोबत जोडले.जे आज आपण कुलदैवत म्हणून पुजन करतो.

हजारो वर्षांपूर्वी तापी व रेवा (नर्मदा)नदीच्या मध्ये दाब नावाचे राज्य होते. आजही तो परिसर हेलोदाब म्हणून ओळखले जाते.

तेथे राजाकोलपासा याचे राज्य होते. दाब राज्याच्या भोवताली असलेल्या प्रमुखांना एकत्र आणून त्यानी मोठे राज्य स्थापन केले होते.त्याभागातील ताब्यात असलेल्या भुभागाला पाटी(खोंड) म्हणून ओळखले जात असे. दाब या सांस्कृतिक केंद्रस्थाना पासुन भोवताली चारही दिशांना आदिवासी बोली भाषेत खोंड (पाटी)म्हणून ओळखतात.त्याना नांवेही दिली आहे.पुर्वेला निमाड
पाटी,पश्चिमेला आंबुडापाटी, दक्षिणदिशेला देहवाल व मावचार पाटी,उत्तर दिशेला नाहाल व नोयरपाटी अशा प्रकारे नांवे त्याकाळी ठेवण्यात आली होती. या दाब मंडळात टुडोमोडवी, पेचरोपुंजारा,हेंगलोगुण्यो असे जाणकार मंडळी होती. कोलपासा,बाहगोर्या, देवगोंदारी, राजपांठा, विन्यादेव, आगीपांडर, पोरबदेव,सिडगोवा, देव सिनट, गिंबदेव हे दाब मंडळाचे प्रमुख होते. राजपांठा व विन्यादेव यांच्या राजगुरू वैदुभिलट व आंबुडापाटीचा प्रमुख राजातारहामहल,राजापांठाची आई उमरावाणू हे राज्य कारभारात सल्ला देत असे. दाबच्या राजाकोलपासा हे निमाड पाटीचे प्रमुख कुंदुराणा,देवकुंबाय, रेलाकबाड्या,आंबुडापाटीचे प्रमुख तारहामहल,देवभिलट, गाजळगोटा,देहवाल व मावचार पाटी प्रमुख देव निमजी, नोयरपाटीचे सिडगोवा,देववोरताया चारही पाटी प्रमुख यांची वर्षातुन एकदा मोठी सभा कोलदाब येथे घेत असत. त्या सभेला मोलहोबाय असे नांव होते. मोलहोबाय ही राजा गिंबल्या याची राणी. मेघरायाच्या मुलगा राजा गिंबल्या होता. त्याकाळी धरतीवर दुष्काळ पडला, त्यात जीवसृष्टीतील मानव, पशु, पक्षी, वृक्ष यांना नैसर्गिक संकटाच्या सामना करावा लागला. त्यावेळेस राजा गिंबल्या यानी सात समुद्र (दोर्या ) फिरून पाणी गोळा करून धरतीवर पाऊस पाडला त्यामुळे राजा गिंबल्या या सृष्टी च्या फलधारणा देणारा देव मानून गिंब महिना हा फळ, फुल, वृक्ष यांना व सृष्टिला सजवणारा महिना मानला जातो. मोलहोबाय
सभेत चारही पाटीचे प्रमुख आपल्या जनतेच्या हिताचे महत्त्वाचे ठराव करीत असे.या प्रमुख पंचाच्या निर्णयाने दाब मंडळातील व्यक्तींना वेगवेगळे जबाबदारीचे काम सोपविले जात. त्यात बाहगोर्या याला दाबमंडळाच्या कोठार प्रमुख, राजासिडगोवा याला वसुलीचा प्रमुख म्हणून नेमले होते. राजपांठा व विन्यादेव हे सर्व प्रमुख पंचात अतिशय सामर्थ्यवान व बुध्दीमान असल्याने त्यांच्यावर



संपूर्ण दाब मंडळाचे देखरेखीचे व सुरक्षेचे काम देण्यात आले होते. राजाकोलपासा नगरी हेलोदाब मध्ये बाहगोर्या,सिडगोवा, दोध्यावजीर,खेटापुजारा, टुडोमोडवी हे सर्व बाबाहेगवा, बाबाडुंगो, बाबाओढुवा, बाबाठोढगा, बाबा रोज्या, बाबाहाटो,बाबाखोगज्या,जाम्बुगढ,बाहाआंबाडा या दाब मंडळाच्या शिवरातील देवदेतांचे पुजन करायचे.त्यासाठी काकड झाडाचे पुजाकरून निसर्गाचे प्रतिक बनविले होते.

कोलदाब :-कोल म्हणजे पृथ्वीचा मध्य भाग. दाब म्हणजे खड्यांची जागा. दाब गावात पुर्वीच्या काळी राजापांठा व विन्यादेव यानी गांवदिवाळी साजरा केली. त्यावेळी नाचुन-नाचुन पाडलेली खड्डयाची जागा दाबली गेली म्हणून दाब नांव पडले.

कोलदाब येथील दाब्याडावर व काल्या वेअड्या परिवार -- दाब येथे सृष्टीतील पहिलाजीव कोलपासा याच्या अवतार आला त्याच्यापरिवार मेघराया, हुर्रिंगपासा होते. तर काल्या वेअड्या परिवार हा गोऱ्या कोठार यांच्या होता. त्या परिवारात पोहली पांडर, विन्यादेव, याहा मोगी याच्या अवतार आला . गोऱ्या कोठारची राणी देवगोंदारी घरी एकटी असताना लहान बाळ रडण्याच्या आवाज आला म्हणून आवाजाच्या दिशेने पाहत पाहत गेली असता भोपळ्याच्या फुलात लहानबाळ सापडले बाळ रडत असल्याने घरी आणुन संगोपन केले . त्या बाळाचे पोहलीपांडर नांव ठेवले . परत देवगोंदारी उकीरड्यावर शेण टाकायला गेली असता कंदमुळाच्या वेल दिसली ती वेल धरून खोदली असता जमिनीत विन्यादेव सापडला त्याचेही संगोपन गोर्या कोठार व देवगोंदारी यानी केले. दाब मंडळाच्या कोठार प्रमुख बाहगोर्या यानी विन्यादेव, आगीपांडर(कणी),अनहोरीदेव, (मका)यांचे पालन पोषण केले होते. पुर्वीच्या काळी समुह शेती करण्याची प्रथा होती.त्याप्रमाणे बाहगोर्या यानी नवीन शेती केली व त्या शेतात कणी(ज्वारी)ची पेरणी केली.शेत निंदणीसाठी लाह्या(सामुहिक मदत)दाब मंडळातील प्रजेला मदतीसाठी बोलावले होते.लाह्यासाठी आलेल्या लोकांना जेवण व महुफुलाची दारू दिले.कणी (ज्वारी)जेव्हा पिकुन झाल्यावर कापल्यानंतर खळ व पांडर (धरती)पुजन राजापांठा याने केले. राजापांठा हा अतिशय बलवान व वेगवेगळ्या शस्त्र विद्येत प्रविण होता.तरूणपणी राजपांठा हा त्याच्या वडिलांच्या घाणीखुंट राज्यातील प्रजेला नेहमी मदत करीत असे. राजापांठाला नऊ राण्या होत्या. त्या देवरूपण,देवकाटण, देवमुरखु,देवकुपल,मांडववोरही, हेलीवोडल,आगीपांडर,फुलमोगरा यापुर्वीच्या आठ राण्या होत्या. ईकडे हेलोदाब येथे रेलानकेला देवी व पांग्यावणजी यांच्या घरात याहामोगीच्या जन्म झाला होता. याहामोगीला मोगीपेंडरी, आगीपांडर,कणी, अनहोरीदेव, निसबकसबदेव, कुयटीआथुटी, उरतीनपुरतीदेवी ही भाऊ बहिण होते. याहामोगी वयात आल्यावर राजापांठाने तिला लग्नाची मागणी घातली.परंतू राजापांठाला पुर्वीच्या आठ राण्या होत्या.तो केवळ आपल्या सौंदर्यावर मोहित होऊन आपल्याशी लग्न करू इच्छितो, असे वाटल्याने राजापांठाला घर जावई म्हणून दाबच्या राजाकडे राहण्याची अट घातली.आपल्या पुर्वीच्या आठ राण्या असुन देखील याहामोगीला प्राप्त करण्यासाठी दाबच्या राजाकडे सातवर्षे घरजावई म्हणून राहिला सात वर्षांच्या सेवाकाळ पुर्ण केल्या नंतर ते दोघेही घाणीखुंट येथे राहुन जीवन जगावयाचे ठरविले.परंतु त्याना राजा तारहामहल यानी घरात घेतले नाही.राजपांठा व याहामोगी अनेक प्रकारच्या हाल अपेष्टा सहन करीत जंगलात भटकत राहीले.त्यानंतर त्यानी देवमोगरा गांव बसविले.व दोघे तेथे एक झोपडीवजा घर बांधून राहु लागले. त्या कालावधीत बारा वर्षाचा दुष्काळ पडला. दाब मंडळातील व परिसरातील प्रदेशातील लोकांची गुरेढोरे मरण पावली.बरेच लोक या दुष्काळात मरण पावले व काही लोक आपली घरेदारे सोडून निघुन गेले. दाब मंडळातीला राज्ये उजाड सारखे झाले.या कालावधीत याहामोगीने उपासमारीने हैराण झालेल्या लोकांना भरपुर अन्नधान्य व पशुधन दिले. लोकांना भाकरीसाठी अन्नधान्य व पशुधन पुरविले म्हणून दाब मंडळातील प्रजा याहा मानु लागले. आदिवासी मध्ये याहा म्हणजे आई व मोगी म्हणजे किंमत करू शकत नाही. आदिवासी भिलीभाषेत धरती (याहामोगी)पांडरला मोढीयाहा, कणी(धान्य) कणीकसरीला हानीयाहा सांगतात.असे सांगितले जाते की, धरती(पांडर)चे दुध पिऊन हानीयाहा कणी(धान्य) मोठी होत असते व हानीयाहा (कणी)चे दुध पिऊन आपण जगत आहोत. ज्यामुळे आपली उत्पत्ती व जीवन या सृष्टीवर आहे

*देवुहोरो :- महुची दारू या धरतीवर राजपांठा विन्यादेव यानी पुर्वीच्या काळी महुफुलापासुन दारू बनविली. त्याला आदिवासी बोली भाषेत होरो म्हणतात. ही दारू (होरो)आदिवासी समाज सण- उत्सव,सुख-दु:खाच्या वेळेस देवी-देवतांना नैवैद्य देऊन पुजा केली जाते.होरो(दारू)पवित्र मनाने बनवावी लागते.ती दारू देवु होरो सांगतात. ती दारू बनविण्यासाठीत्या कुटुंबातील व्यक्तीला पवित्र मन,वचनने सज्ज राहावे लागते. त्यासाठी नदीवर जाऊन डोक्यातदही व बेलपानाने आंघोळ करावी लागते.त्यानंतर घरी येऊन पुजा करून माठामध्ये महुफुले टाकावे लागतात. पाच दिवसात महुफुलाची दारू बनवितात.ज्या दिवशी याहामोगी पुजनासाठी जायचे असेल त्यादिवशी बोत (मातीचे भांडे) मध्ये होरो(महुदारू )भरतात त्या बोतला हिदारी (बांबूची टोपली ) मध्ये कणी (धान्य)सोबतठेवतात. आदिवासी समाजातअशी कहानी आहे की,राजपान्डो देवकालाव (मोर)बनुन बांबुच्या फांदीवर बसुन आवाज देतो तेव्हाच पाऊस येतो.तसेच जेव्हा याहा कणी (धान्य) रूपात होती तेव्हा बांबुच्या मुळात(बुंधा) लपली होती. तिला टुडाबोडवा, पेचरापुंजारा,हेंगलागुण्या या दाब मंडळातील जाणकार पंचानी शोधुन काढली होती.याहा(कणी) ला बांबुचे घर पसंत होते.म्हणून आदिवासी समाजात कणी(धान्य) बांबूच्या कणगी (कोठी), मातीच्या बोदडी (कोठी)मध्येच ठेवतात. ज्यामुळे याहामोगी सुखी असते. त्यामुळे कुलदेवीला नवस करण्यासाठी शेतात पिकलेली कणी (धान्य) बांबूच्या टोपली (हिदारी)मध्ये ठेवुन वाजतगाजतघेऊनजातात.

याहामोगी पुजन परंपरा ** :-शेतातील धान्यपिकल्यावर आपल्याशेतातीलकणी(धान्य)एक टोपली मध्ये भरून दर वर्षी दाब मंडळातील निमाडपाटी, आंबुडापाटी,देहवाल मावचारपाटी,नोयरपाटी व नाहालपाटी या प्रदेशातील प्रजा देवमोगरा गांवीआमावस्ये(खुट्टा) च्या दिवशी सामुहिक (होब) एकत्र होऊन शेताच्या व धान्या (कणी)च्या शोध लावलेल्या आपल्या देवी देवतांचे पुजन तसेच त्यानी तयार केलेल्या कोठार मध्ये धान्य बियाणे स्वरूपात ठेवण्यासाठी जेव्हा भविष्यात दुष्काळ पडला तर हे साठवुन ठेवलेले बियाणे परत मिळेल.या आशेने कोठार मध्ये जमा करत होते. ही परंपरा १५हजार वर्षांपूर्वीची असुन ती परंपरा आजही चालत आहे. जे आज आपण हिदारी स्वरूपात आणत असलेल्या टोपलीतील विविध प्रकारचे धान्य(कणी) पुजन करताना पाहतो.

*याहामोगीची पुजा हिदारी, कणी,महुफुलाचा दारूने होते. आदिवासी समाजातील कोणत्याही देवीदेवता याना फुल-हार,अगरबत्ती,नारळ,सेंदुर चढवला जात नाही. कथा ही आहे की,याहामोगी धनधान्य, फळ, फुल,वृक्ष,पान,कंदमुळे, कणी कनसरीचा विविध रूपात धरती पोटी जन्म घेतला आहे. त्यामुळे या धरतीवर पान,फुल,फळ हे परिपक्व होण्या अगोदर तोडुन टाकणे प्रकृति विरुद्ध आहे. आदिवासी समाजाची हीपरंपरा हजारो वर्षांपूर्वीची असुन आदिवासी समाजाचे दाब मंडळातील देवीदेवता याना नवीन धान्य अर्पण करणे व परंपरा जीवंत ठेवण्यासाठीउत्सव आहे.आदिवासी समाजातील वैभवशाली,मौखिक,सांस्कृतिक पुर्वापार रूढीपरंपरा चालत आलीआहे. त्या संस्कृति व कणीच्या उगम दाब येथुन झाला आहे. तीच संस्कृति आदिवासी समाजात रूढ झाली ती आजही कायम आहे.

# महाराष्ट्रात थेट विक्री क्षेत्राची घोडदौड

## ‘महाविकास २०२६’मध्ये सरकार-उद्योग-ग्राहक यांचा संवाद; २,८७९ कोटींची उलाढाल, राज्य आघाडीवर

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

देशातील थेट विक्री (डायरेक्ट सेलिंग) क्षेत्रात महाराष्ट्राने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले असून, तब्बल २,८७९ कोटी रुपयांच्या उलाढालीसह राज्य देशात पहिल्या क्रमांकावर पोहोचले आहे. मुंबईतील 'वाय. बी. चव्हाण' सेंटर येथे आयोजित 'महाविकास २०२६' या विशेष परिषदेत राज्याच्या या दैदीप्यमान प्रगतीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. 'इंडियन डायरेक्ट सेलिंग असोसिएशन' (आयडीएसए) आणि महाराष्ट्र शासनाचा 'अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग' यांच्या संयुक्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या परिषदेत शासकीय अधिकारी, ग्राहक आयोगाचे सदस्य, उद्योग क्षेत्रातील दिग्गज आणि 'माविम'च्या बचत गटांमधील महिला उद्योजिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. थेट विक्री क्षेत्रात पारदर्शकता आणणे, ग्राहकांचे हक्क जोपासणे आणि महिलांना शाश्वत उपजीविकेची साधने उपलब्ध करून देणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश होता. आयडीएसएच्या आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या वार्षिक सर्वेक्षणानुसार, देशातील थेट विक्री उद्योगाने २२,१४२ कोटी रुपयांची उलाढाल नोंदवली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ४.०४ टक्के वाढ झाली असून, देशभरात ८८ लाखांहून अधिक थेट विक्रेते या क्षेत्राशी जोडले गेले आहेत. त्यापैकी सुमारे ३९ लाख महिला आहेत.महाराष्ट्र या वाढीचा सर्वात मोठा घटक ठरला आहे. राज्यात २,८७९ कोटी रुपयांची उलाढाल नोंदली गेली असून, राष्ट्रीय बाजारपेठेत १३ टक्के हिस्सा महाराष्ट्राचा आहे. राज्यात १० लाखांहून अधिक



सक्रिय थेट विक्रेते उपजीविका करत आहेत. त्यामुळे उद्योगवाढ आणि जबाबदार व्यावसायिकता या दोन्ही बाबतींत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचे अधोरेखित झाले.परिषदेत नियामक चौकट, तक्रार निवारण यंत्रणा आणि जबाबदार व्यवसाय पद्धतींवर सखोल चर्चा झाली. ‘स्मार्ट ग्राहक, मजबूत बाजारपेठ’या सत्रात थेट विक्री प्लॅटफॉर्मची पडताळणी कशी करावी, ग्राहक हक्क काय आहेत आणि संरक्षणाच्या उपाययोजना कोणत्या, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.या सत्रात जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षा वंदना मिश्रा आणि ग्राहक वकील संघटनेचे सदस्य ॲड. उदय वारुंजीकर यांनी मार्गदर्शक विचार मांडले. कार्यक्रमात उद्योग क्षेत्रातील प्रमुखांनीही आपले विचार मांडले. मोदीकेअरच्या सीओओ सोमा मैत्रा, ॲटॉमी इंडियाचे सीईओ/एमडी डॉ. अब्राहम ली, आयडीएसएचे अध्यक्ष डॉ. रत्नेश लाल आणि खजिनदार विवेक काटोच यांनी उद्योगातील पारदर्शकता, तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्राहक संरक्षणाच्या उपाययोजनांवर भर दिला. ‘महिलांना उद्योजकतेतून सक्षम बनवणे’ या सत्रात महिला थेट विक्रेत्या आणि ‘माविम’ स्वयंसहाय्यता गटांच्या यशकथा मांडण्यात आल्या. ग्रामीण व शहरी भागांतून शाश्वत उपजीविका उभारणाऱ्या महिलांचा सन्मान पुरस्कार देऊन करण्यात आला.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव अनिल डिग्गीकर म्हणाले, नियम केवळ कागदावर न राहता प्रभावी अंमलबजावणी झाली, तरच त्यांचा परिणाम दिसतो. ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव असावी आणि कंपन्यांनी उत्तरदायित्व स्वीकारले पाहिजे. या संतुलनातूनच सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह बाजारपेठ निर्माण होते. आयडीएसएच्या उपाध्यक्षा अपराजिता सरकार यांनी सांगितले, वाढ केवळ प्रमाणावर नव्हे, तर विश्वासावर मोजली जाते. पारदर्शक आणि न्याय्य पर्यावरण महिलांना आत्मविश्वास देते, उद्योजकतेला चालना देते आणि शाश्वत उत्पन्नाचे मार्ग खुले करते.‘महाविकास २०२६’चा समारोप ग्राहक जागरूकता, नैतिक आचारसंहिता आणि महिलांच्या उद्योजकतेला बळकटी देण्याच्या संयुक्त वचनबद्धतेने झाला. महाराष्ट्रातील थेट विक्री क्षेत्राचे भवितव्य विश्वास आणि पारदर्शकतेवर उभे राहील, असा स्पष्ट संदेश या परिषदेतून देण्यात आला.

# चार लेबर कोडच्या विरोधात एटापल्ली तहसील कार्यालयावर लाल लाट

**दैनिक वादळ वार्ता**
**सिरोंचा । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कामगारविरोधी व कॉर्पोरेटधार्जिण्या ४ लेबर कोडच्या निषेधार्थ सेंट्रल ट्रेड युनियन आणि संयुक्त किसान मोर्चाच्या देशव्यापी आवाहनाला प्रतिसाद देत अहेरी विधानसभा क्षेत्रात आज ऐतिहासिक आम हडताल यशस्वी ठरली. अहेरी विधानसभा क्षेत्रात सर्वत्र काम बंद ठेवण्यात आले असून संघटित व असंघटित कामगारांनी एकजुटीची ताकद दाखवली. आशा सेविका, अंगणवाडी कर्मचारी, शालेय पोषण आहार कर्मचारी, सफाई कामगार, कंत्राटी कर्मचारी, शेतकरी, शेतमजूर व इतर कष्टकरी वर्गाने संपात उत्स्फूर्त सहभाग घेतला. अनेक ठिकाणी शासकीय व निमशासकीय कामकाज ठप्प राहिले. ४ लेबर कोड रद्द करा, कामगार-शेतकरी एकता जिंदाबाद, कामाचे तास वाढवणे बंद करा, कॉर्पोरेट राजवट हद्दपार करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.
आंदोलकांनी एटापल्ली तहसील कार्यालयाला धडक देत प्रशासनाला मागणीपत्र सादर केले.।मुळे निवेदनात ४ लेबर कोड तात्काळ रद्द करावेत, कामाचे तास वाढविण्याचा निर्णय मागे घ्यावा, ८ तासांचा कामाचा दिवस कायम ठेवावा, किमान वेतनाची कायदेशीर हमी द्यावी, कंत्राटीकरण थांबवावे, कामगारांना सामाजिक सुरक्षा व नोकरीची हमी द्यावी, अशा ठाम मागण्या मांडण्यात आल्या.
या संघर्षाचे नेतृत्व कॉ. सचिन मोतकुरवार (अध्यक्ष, आयटक - अहेरी विधानसभा) यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कॉ. सुरज जक्कुलवार, कॉ. शुभम वननमवार, कॉ. रितेश जोई, कॉ. विशाल पुज्जलवार, कॉ. चंदू कंबलवार, कॉ. पदमा मावणुरवार, कॉ. रवी अलोने, कॉ. पांडू कोरसा, कॉ. सुरेश मज्जी, कॉ. ओंडरे ताई तसेच असंख्य कार्यकर्त्यांनी संप यशस्वी केला.यावेळी कॉ. सचिन मोतकुरवार यांनी ठामपणे सांगितले की, ४ लेबर कोडमुळे कामगारांचे हक्क हिरावले जात असून कामाचे तास वाढवून शोषण अधिक तीव्र करण्याचा प्रयत्न सुरू आहे. ८ तासांच्या ऐतिहासिक लढ्याने मिळविलेल्या हक्कांवर गदा आणण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही सहन करणार नाही. कामगार-शेतकरी एकजुटीच्या बळावर हे कायदे रद्द करूनच राहू.
अहेरी विधानसभा क्षेत्रातील सर्वत्र झालेल्या कामबंद व एटापल्ली तहसील कार्यालयाला दिलेल्या धडकेमुळे आजची हडताल प्रभावी, लढाऊ व निर्धारपूर्ण ठरली. कष्टकरी वर्गाने आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठी निर्णायक संघर्षाची दिशा स्पष्ट केली आहे.






## उर्दू विभागाला डावलल्याचा आरोप;गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे धाव

**दैनिक वादळ वार्ता**
**माहूर । प्रतिनिधी**

केंद्रीय जिल्हा प्राथमिक शाळा माहूर (उर्दू/मराठी) येथील पालक समिती अध्यक्ष निवड प्रक्रियेबाबत गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार सादर करण्यात आली. अध्यक्ष निवड प्रक्रियेदरम्यान अनियमितता झाल्याचा तसेच उर्दू विभागाला डावलण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.
सदर शाळेत नुकतीच पालक समितीची नियुक्ती करण्यात आली असून, समितीत उर्दू विभागाचे चार व मराठी विभागाचे सात असे एकूण अकरा सदस्य निवडण्यात आले. तथापि, अध्यक्ष निवड प्रक्रियेत सर्व सदस्यांचा सहभाग न घेता निवड करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.
यावर्षी उर्दू विभागाचा अध्यक्ष निवडणे अपेक्षित असताना तसे झाले नसल्याची बाब तक्रारीत नमूद करण्यात आली आहे.
तसेच, अध्यक्ष निवडीच्या बैठकीदरम्यान उर्द विभागातील सदस्यांना सहभागी होऊ देण्यात आले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. कार्यकाळ संपलेल्या समितीच्या माजी अध्यक्षांनी निवड प्रक्रियेत हस्तक्षेप केल्याची बाबही तक्रारीत मांडण्यात आली आहे.
या संदर्भात संबंधित प्रकरणाची चौकशी करून अध्यक्ष निवड प्रक्रिया नियमबद्ध व पारदर्शक पद्धतीने पार पाडावी, अशी मागणी करण्यात आली आहे.तक्रार सादर करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सईद अली, इरफान फारूकी, डॉ. जुनेद बावानी, समद सौदागर, मुश्ताक बागवान, वासीम कूरेशी, राहील सय्यद, लतीफ बागवान, जुनेद सौदागर व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## माटवर्शी येथील बंद नळ योजना सुरू; कॉ.सचिन मोतकुरवार यांच्या पाठपुराव्याने पाणी प्रश्न निकाली

**दैनिक वादळ वार्ता**
**सिरोंचा । प्रतिनिधी**

एटापल्ली तालुक्यातील मौजा माटवर्शी (ग्रामपंचायत गट्टा) येथील सौर ऊर्जा आधारित लघु नळ पाणी पुरवठा योजना पुन्हा सुरू करण्यात आली असून गावातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. जल जीवन मिशन (२०२२-२३) अंतर्गत उभारण्यात आलेली ही योजना काही महिन्यांपासून बंद अवस्थेत होती.
यामुळे गावातील महिला, लहान मुले व वृद्धांना पिण्याच्या पाण्यासाठी लांब अंतरावर जावे लागत होते. पाण्याअभावी नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने माटवर्शी ग्रामसभेने भारतीय कम्युनिस्ट पार्टी चे जिल्हा सहसचिव कॉ. सचिन मोतकुरवार यांच्याकडे मदत मागितली होती.
ग्रामसभेच्या विनंतीची दखल घेत कॉ. मोतकुरवार यांनी शासन-प्रशासनाशी सतत पाठपुरावा केला. संबंधित विभागाशी संपर्क साधून बंद पडलेली यंत्रणा तातडीने दुरुस्त करून योजना कार्यान्वित करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाने योजना दुरुस्त करून पुन्हा सुरू केली.
नळ योजना सुरू झाल्याने गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून पिण्याच्या पाण्यासाठी होणारी पायपीट थांबली आहे. ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत भविष्यातही गावातील मूलभूत प्रश्न भाकपाने तत्परतेने सोडवावेत, अशी भावना व्यक्त केली आहे.




## नगरम येथे समक्का-सारक्का बोनलू कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद अध्यक्षा भाग्यश्रीताई हलगेकर यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक वादळ वार्ता**
**सिरोंचा । प्रतिनिधी**

नगरम येथील समक्का-सारक्का बोनलू उत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद अध्यक्षा भाग्यश्रीताई हलगेकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.
कार्यक्रमाची सुरुवात देवी समक्का-सारक्का यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आली. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत बोनलू अर्पण करत ढोल-ताशांच्या गजरात देवीची आराधना केली. परिसरात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले होते.
यावेळी बोलताना भाग्यश्रीताई हलगेकर यांनी समक्का-सारक्का माता या श्रद्धा आणि शक्तीचे प्रतीक असल्याचे सांगितले. समाजातील ऐक्य, परंपरांचे जतन आणि सांस्कृतिक वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाज एकत्र येतो आणि बंधुभाव वृद्धिंगत होतो, असे त्या म्हणाल्या.
कार्यक्रमास ग्रामस्थ, महिला मंडळे, युवक तसेच मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.यावेळी उपस्थित जम्पन्ना कंबगोणी, विजय तोटा पेदीटी सागर, मालांना पडला, राजू सलावर, संपत कोडोली आदी गावकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## श्री क्षेत्र भंडारेश्वर मंदिर वैरागड येथे गुंजणार हर हर महादेवाचा गजर १४ ते १६ फेब्रुवारी पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम

**दैनिक वादळ वार्ता**
**वैरागड । प्रतिनिधी**

आरमोरी तालुक्यातील मौजा वैरागड येथे दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ पासून महाशिवरात्री निमित्त धार्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त भोलूभाऊ सोमनानी व मित्रपरिवार वैरागड यांच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या होत असलेल्या महाशिवरात्रीच्या मंगलमय सोहळ्यास भक्तगणांनी मोठ्या संख्येने सहकुटुंब, मित्रपरिवारासहित उपस्थित राहण्याचे आवाहन भोलूभाऊ सोमनानी व मित्रपरिवार वैरागड यांनी केले आहे.
कार्यक्रमाचे स्वरूप -
शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९:०० (नव) वाजता घटस्थापना व महाहवन.
स्थळ - भोलूभाऊ सोमनानी यांचे निवासस्थान वैरागड येथे. त्यानंतर दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८:०० वाजता महाशिवरात्रीच्या शुभ पर्वावर महादुग्धाभिषेक व त्रिशूल पूजन श्री क्षेत्र भंडारेश्वर मंदिर वैरागड येथे होणार, सकाळी १०:०० वाजता महारुद्राभिषेक श्री भोलूभाऊ सोमनानी यांच्या निवासस्थान या ठिकाणी, त्यानंतर सायंकाळी ४:३० वाजता भव्य त्रिशूल मिरवणूक भोलूभाऊ सोमनानी यांच्या निवासस्थानापासून मुख्य मार्गाने श्री क्षेत्र भंडारेश्वर मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यात येणार आहे. आणि मिरवणुकीनंतर मंदिरामध्ये विधिवत त्रिशूल स्थापना करण्यात येईल.
त्यानंतर दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता श्री जगन्नाथ बाबा जन्मोत्सवा निमित्त सायंकाळी ३:०० वाजता व गोपालकाला दुपारी ४:०० वाजता आणि त्यानंतर महाप्रसाद (महाभोजन) सायंकाळी ५:०० वाजेपासून भोलूभाऊ सोमनानी यांच्या घरासमोरील पटांगणाचे आवारात महाभोजन होणार आहे तरी सर्व भाविक भक्तांनी या धार्मिक उत्सवामध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री. भोलू भाऊ सोमनानी व मित्रपरिवार वैरागड यांनी केले आहे.




# निर्मितीमूल्य शिक्षणातून समाजाचा सर्वांगीण विकास शक्य-डॉ.किन्हाळकर

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

देगलूर सध्याच्या काळात वरवरचे शिक्षण देण्याच्या पद्धती रुढ होत असून ते येणाऱ्या काळासाठी चिंताजनक आहे, शिक्षणातून समाजाला निर्मितीमूल्य देता आले पाहिजे. विवेकशील, संस्कारित, शिस्तप्रिय, शिक्षकच आदर्श नागरिक घडवतात. यासाठी खोलवर रुजवणारे शिक्षण देणाऱ्या संस्थाचा वाटा राष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान देऊ शकतात असे प्रतिपादन माजी गृहराज्यमंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर यांनी केले.
तडखेल येथील गजानन माध्यमिक विद्यालयात माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ बुधवार ता. ११ रोजी आयोजित करण्यात आला होता.
यावेळी विविध क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या विद्यालयातील ५० माजी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी प्रसिद्ध साहित्यिका डॉ. वृषालीताई किन्हाळकर, माजी शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर, माजी सभापती शिवाजीराव देशमुख बळेगावकर, संपादक केशव घोणसे पाटील, प्रल्हादराव उमाटे, गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे, विवेक पाटील, सरपंच श्री. कठारे,संस्थेचे अध्यक्ष बालाजीराव इंगळे यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.
गुणवत्तेवर आधारित शिक्षण दिले गेले तरच समाजाला त्याचा फायदा होईल. स्वतःच्या उन्नतीपेक्षा इतरांना काय देता आले पाहिजे, हे जोपर्यंत राज्यकर्त्यात रुजणार नाही , तोपर्यंत समाजाचा सर्वांगीण विकास अशक्य असल्याचे सांगून डॉ. किन्हाळकर यांनी माझ्या पालकमंत्री पदाच्या काळात शिक्षणाबाबतीत नांदेड जिल्हा राज्यात खालून दुसऱ्या स्थानावर होता . बृहत आराखडा तयार करून जिथे शिक्षण पोहोचले नव्हते, अशा दुर्गम भागात ११० शाळांना मान्यता देण्याचे काम त्या काळात केले गेले ,त्यातून गजानन ही शाळा ही उभी राहिली. आज येथील विद्यार्थी विविध क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्काराला उपस्थित राहता आले ही समाधानाची बाब असल्याचे ते म्हणाले.
यावेळी माजी शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी पारंपारिक शिक्षणापेक्षा नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणारे शिक्षण देण्यासाठी आता समूहाने पुढे येण्याची गरज असल्याचे सांगितले. साहित्यिका डॉ. वृषालीताई किन्हाळकर यांनी इंग्रजी ही एक भाषा असून तिचा बाऊ न करता विद्यार्थ्यांनी सकस ,सहज ,सरस या त्रिसूत्रीचा वापर करून ज्ञान आत्मसात करावे. शिक्षणातून उत्तम माणूस बनुन आपले उचित ध्येय गाठण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.
ग्रामीण भागात शिक्षण कसदार आहे. पण पायाभूत सुविधा नाहीत म्हणून पालकांचा मराठी शाळा कडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी त्यांच्यात जनजागृती करण्यासाठी शासन स्तरावरच रचनात्मक बदल होण्याची अपेक्षा माजी सभापती शिवाजीराव देशमुख बळेगावकर यांनी व्यक्त केली .
संपादक केशव घोणसे पाटील यांनी गजानन विद्यालयाच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर होताना संस्थेने राबवलेल्या उपक्रमांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.
प्रास्ताविकात संस्थेचे अध्यक्ष बालाजीराव इंगळे यांनी विद्यालयाने गुणवंत विद्यार्थ्यांसाठी राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तर सचिव राजेश्वर अटकळे यांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी तांत्रिक शिक्षणाची या भागात गरज असल्याचे सांगितले .
यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. दाचावार यांनी तर उपस्थितांचे आभार नागनाथ सुकाळे यांनी मानले.
कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक संजय अटकळे, एकताच्या मुख्याध्यापीका प्रियाताई इंगळे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



# खाकीची गुंडगिरी! बातमी दाखवली म्हणून पत्रकारावरच खोटा गुन्हा दाखल

## नेकनूर पोलिसांच्या हुकूमशाहीविरुद्ध माजलगावात संताप

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेवर नेकनूर पोलिसांनी घाला घातला आहे. एका अल्पवयीन मुलीच्या कुटुंबाला झालेल्या मारहाणीची सत्य बातमी समोर आणल्याचा राग मनात धरून, ढत९ मराठीचे जिल्हा प्रतिनिधी अशोक काळकुटे यांच्यावर चक्क खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या या 'वर्दी'तील गुंडगिरीचा आणि हुकूमशाहीचा निषेध करण्यासाठी माजलगाव पत्रकारांच्या वतीने तहसीलदारांना कडक इशारा देणारे निवेदन देण्यात आले.



**नेमके प्रकरण काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, नेकनूर पोलीस स्टेशनमध्ये १० फेब्रुवारी रोजी अशोक काळकुटे वार्तांकनासाठी गेले होते. यावेळी कर्तव्यावर असलेल्या पोलिसांनी त्यांना प्रचंड अरेरावी केली. वास्तविक, एका १७ वर्षीय मुलीच्या कुटुंबीयांना पोलिसांनी मारहाण केल्याचा गंभीर आरोप होता. ही बातमी प्रसिद्ध केल्यामुळे पोलिसांच्या अहंकाराला ठेच लागली होती. याचाच सूड उगवण्यासाठी काळकुटे यांनी शासकीय कामात अडथळा आणल्याचा बनाव रचून त्यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला.

**विवादित 'त्रिकुटा'वर संताप**

नेकनूर पोलीस ठाण्यातील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कार्यपद्धती गेल्या अनेक दिवसांपासून वादाच्या भोऱ्यात आहे. यामध्ये विशेषत : -झख चंद्रकांत गोसावी, बालासाहेब ढाकणे (गोपनीय शाखा), दत्ता बळवंत (पोलीस हवालदार) यांच्यावर वारंवार गंभीर आरोप होत असून, त्यांच्या अरेरावीचे व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

नेकनूरमध्ये पोलीस प्रशासन चालते की हुकूमशाही? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

**माजलगावमध्ये पत्रकारांचा एल्गार!**

या अन्यायकारक घटनेच्या निषेधार्थ माजलगाव येथील पत्रकार आक्रमक झाले आहेत. तहसील कार्यालय व शहर पोलिसात या बाबत निवेदन देण्यात आले. सत्य लिहिल्यामुळे जर गुन्हे दाखल होत असतील, तर पत्रकारांना ही लढाई रस्त्यावर उतरून लढावी लागेल . पोलिसांनी आपली वर्दी सत्तेचा किंवा दहशतीचा गैरवापर करण्यासाठी वापरू नये. नेकनूर येथील दोषी पोलिसांवर तात्काळ निलंबनाची कारवाई व्हावी, अन्यथा येत्या तीन दिवसात होणाऱ्या व्यापक 'जनआक्रोशाला प्रशासन जबाबदार असेल. - माजलगाव पत्रकार , प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल न घेतल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा निर्धार या पत्रकारांनी व्यक्त केला आहे. आता जिल्हा पोलीस अधीक्षक या मुजोर कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.! या दिलेल्या निवेदनावर राज जागीरदार, अमर साळवे, अनंत घडशिंगे, दर्शन डोंगरे, निलेश गरुड यांच्यासह वैभव झगडे, सुनील थोरात, मच्छिंद्र उफाडे, प्रकाश यादव, विजय डावरे या पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# श्री स्वामी समर्थ केंद्र केज येथे मोफत आरोग्यशिबीर संपन्न

## सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वरचा स्तुत्य उपक्रम

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने व गुरुपुत्र आदरणीय दादासाहेब यांच्या आदेशानुसार सद्गुरू प.पू.मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर आयोजित श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समर्थ नगर येथे मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबिर मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले.




या शिबीराची सुरुवात दिपप्रज्वलन व धन्वंतरी पूजन करुन झाले यावेळी सद्गुरू प.पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वरचे डॉ.मोहनराव गौरकर,डॉ.श्रीकांत सलोने,सौ.अर्चनाताई रमेशराव आडसकर, भारतीय जनता मजदुर संघाचे महाराष्ट्र सचिव पत्रकार धनंजय कुलकर्णी,भारतीय जनता मजदुर संघाचे मराठवाडा सचिव पत्रकार चंद्रकांत पाटील,ह.भ.प.दिपक महाराज मेटे,अड.सौ. राजश्रीताई मुंडे,सौ.बोबडे मॅडम तसेच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज कॅन्सर रिसर्च सेंटरचे डॉक्टर टीम, आरोग्य दूत जिल्हा प्रतिनिधी शिवशंकर भंडारे,तसेच गावातील सर्व स्वामीभक्त कार्यकर्ते राजकुमार गुंडेवार,श्रीराम शेटे,आगळे सर,कापरे सर,आळणे सर,विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे विश्वस्त शिवाजीराव कांबळे, वल्लभ दादा राऊत,सोनी साहेब इत्यादी उपस्थित होते.यावेळी सौ. अर्चनाताई रमेशराव आडसकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.व डॉ. मोहनराव गौरकर,यांनी सद्गुरू प.पू.मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर,जनकल्याण योजना व आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. यावेळी गावातील सर्व ग्रामस्थ महिला,पुरुष, नागरिक,सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हे शिबिर यशस्वी करण्या साठी स्थानिक सर्व कार्यरत सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले.यावेळी उपस्थित महिला व पुरुष मंडळी यांची आरोग्य तपासणी व नाडी परीक्षण करून योग्य औषधोपचार व आरोग्य विषयक सल्ला देण्यात आला.केज येथील नागरिकांनी समाधान व्यक्त करीत या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले आहे.

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील कथित गैरव्यवहार प्रकरणी २३ फेब्रुवारीपासून आमरण उपोषण

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

अरविंद बनसोडे कुरनूरकर:आज दि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली येथील निफ्टी अर्बन अँड फॉरेस्ट मॅनेजमेंट कमिटी' निधीतील कथित आर्थिक गैरव्यवहार, प्रशासकीय अनियमितता व लाच देण्याच्या आरोपांबाबत पत्रकार व सामाजिक कार्यकर्ता व विद्रोही पत्रकार डॉ. राजन माकणीकर यांनी वनसंरक्षक व संचालक यांना अंतिम निवेदन सादर केले आहे.




सदर निवेदनात मजुरांच्या नावाने निधी जमा करून तो अल्पावधीत काढण्यात आल्याचे प्राथमिक व्यवहारांवरून दिसून येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. उपस्थिती नोंदी व खर्च विवरणातील विसंगती, वनसंपत्तीशी संबंधित अनधिकृत गवत विक्री तसेच काही कर्मचाऱ्यांचे गैरवर्तन यांचाही उल्लेख करण्यात आला आहे. याशिवाय, तक्रार मागे घेण्यासाठी एका अधिकाऱ्याने रुपये २,००,०००/- देण्याचा प्रस्ताव मांडल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, त्यासंदर्भातील व्हिडिओ पुरावा उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आले आहे. हा प्रकार भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अंतर्गत दखलपात्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. डॉ. माकणीकर यांनी मागणी केली आहे की, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, निधी व्यवहारांचे लेखापरीक्षण व फॉरेन्सिक तपास करावा, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे निलंबन करावे, उत्पन्नाच्या ज्ञात स्रोतांपेक्षा अधिक संपत्तीची चौकशी करावी, तसेच तक्रारदार संरक्षणाची अधिकृत नोंद घ्यावी. दरम्यान, पूर्वनियोजित २६ जानेवारी २०२६ रोजी आमरण उपोषणाचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. मात्र, प्रजासत्ताक दिन व शासकीय कारवाईचे औचित्य लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने तो पुढे ढकलण्याची सूचना केली होती. त्यानुसार आता दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येणार असल्याचा ठाम इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाने या गंभीर आरोपांची तातडीने दखल घेऊन पारदर्शक व उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# सुर्डी ते सादोळा रस्त्याचे रखडलेले काम तात्काळ सुरू करा-सामाजिक कार्यकर्ते अजयसिंह राऊत यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील सुर्डी ते सादोळा या १३ किलोमिटर अंतर असलेला रस्ता हॅम प्रोजेक्ट अंतर्गत मंजुर करण्यात आलेला असुन कार्यारंभ आदेश मिळून उद्घाटन देखील झालेले असताना तरी देखील रस्ता काम अद्याप सुरू झालेले नव्हता. वारंवार पाठपुरावा करून रस्त्याचे थोडेफार काम चालू झालं असताना देखील पुन्हा तो बंद पडला त्यामुळे तात्काळ या रस्त्याचे काम सुरू करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अजयसिंह राऊत यांनी केली आहे.



तालुक्यातील सुर्डी ते सादोळा हा रस्ता हॅम प्रोजेक्ट अंतर्गत मंजुर असुन यासाठी ६० कोटी ४० लक्ष रूपयांचा निधी मंजुर आहे. ग्रामीण भागातील अत्यावश्यक गरज असलेला हा रस्ता सुर्डी, राजेगाव, हिवरा, वाघोरा, गव्हाणथडी, काळेगाव डुबा, माळेवाडी, (सुलतानपुर), महातपुरी, पुरूषोत्तमपुरी आदी गावांना जोडण्याचे काम करतो तर या रस्त्यावर प्रामुख्याने उसाची वाहतुक मोठ्या प्रमाणावर आहे. या रस्त्यावर साखर कारखाना ( गुळ युनिट ) देखील आहे. त्यामुळे रस्त्याअभावी अनेक समस्येला सामोरे जावे लागणार आहे तर सद्यःस्थितीत हा रस्ता अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. त्यामुळे शासनाने या रस्ता कामाकडे तात्काळ लक्ष देउन सदरील रस्त्याचे काम तात्काळ करावे. त्याचबरोबर हा रस्ता बहुतांश काळ्या मातीतुन जात आहे, त्यामुले रस्त्याचा दर्जा चांगल्या पध्दतीने राखुन किमान पुढील २५ वर्षे या रस्त्याचा उपयोग व्हावा या दृष्टीने सुर्डी - सादोळा रस्त्याचे काम दर्जेदार व उत्कृष्ट करावे अशी मागणी देखील सामाजिक कार्यकर्ते अजयसिंह राऊत यांनी केली आहे.

**सदरील रस्ता वर पुरुषोत्तमपुरी देवस्थानच्या धोंड्याच्या महिन्याची वाहतूक देखील मे महिन्यात सुरू होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून नव्हे तर देशातून अनेक भविभक्त येणार आहेत त्यांची गैरसोय या रस्त्यावर होणार आहे.**

# मुलंबाळ व जनावरासह काटमपल्ले परिवाराचे देवणी तहसील समोर उपोषण

दैनिक वादळ वार्ता

**देवणी । प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील मौजे आंबेगाव येथिल तहसील कार्यालयासमोर मधुकर काटमपल्ले यांनी न्याय मिळण्यासाठी देवणी तहसील कार्यासमोर जनावरे व मुलाबाळ कुटुंबासह अमरण उपोषण करत आहे प्रशासनाकडे वारंवार दाद मागूनही न्याय मिळत नसल्याने अखेर देवणी तहसील कार्यालया समोर त्यांना हा निर्णय घ्यावा लागला आहे,संपूर्ण कुटुंबासह देवणी अमर उपोषण तहसील कार्यालयासमोर ११ फेब्रुवारी २०२६ पासून आमरण उपोषणाला आपल्या कुटुंबासह जनावरे घेऊन उपोषणास बसला आहे आजचा तिसरा दिवस आहे पण तिकडे कोणी फिरकुन पाहत नाहीत शेतजमीन बळकावण्याचा कट आणि कुटुंबाच्या जीवितास धोका असल्याचे गांभीर्य या तक्रारीतून नमुद केले आहेत नेमके प्रकरण काय?आंबेगाव येथील रहिवासी मधुकर एकनाथ काटमपल्ले यांची मौजे आंबेगाव येथे गट नं. २०/ब/२ मध्ये सामायिक मालकीची जमीन आहे. या जमिनीत त्यांनी उसाची लागवड केली होती. मात्र, २१ डिसेंबर २०२५ रोजी शेजारील काही व्यक्ती आणि साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांनी संगनमताने त्यांच्या शेतात बेकायदेशीर प्रवेश केला. काटमपल्ले यांनी कष्ट करून पिकवलेला ऊस, स्वतःचा असल्याचे सांगून कारखान्याला देऊन टाकला, असा आरोप अर्जात करण्यात आला आहे.प्रशासनाचा 'आदेश' धाब्यावर बसवल्याचा आरोप या प्रकरणी मधुकर काटमपल्ले आणि त्यांच्या मुलाने (नरसिंग काटमपल्ले) पोलीस स्टेशन,




उपविभागीय पोलीस अधिकारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत धाव घेतली. कागदपत्रांनुसार:पोलीस निरीक्षकांनी कारवाईचे पत्र काढले, पण प्रत्यक्षात पंचनामाही झाला नाही.उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी महसूल व भूमी अभिलेख विभागासह संयुक्त कारवाईचे आदेश दिले, पण त्याची अंमलबजावणी झाली नाही.पोलीस अधीक्षकांनी घटनास्थळाचे फोटो पाठवण्याच्या सूचना देऊनही स्थानिक पातळीवर काहीही हालचाल झाली नाही.जीविताला धोका आणि शेवटचा पर्याय तक्रारदाराने नमूद केले आहे की, विरोधी गट आता त्यांच्या शेतात पाट्या करून जमिनीचा ताबा घेण्याचा आणि कुटुंबाला इजा पोहचवण्याचा कट रचत आहेत. न्यायालयात दिवाणी व फौजदारी दावे दाखल करूनही परिस्थिती बदलत नसल्याने, हतबल झालेल्या काटमपल्ले यांनी आता थेट 'आमरण उपोषणाचा' मार्ग स्वीकारला आहे.जर मला आणि माझ्या कुटुंबाला काही झाले, तर त्याला संपूर्णपणे महसूल आणि पोलीस प्रशासन जबाबदार असेल, असा इशारा मधुकर काटमपल्ले यांनी या निवेदनात दिला आहे.आता या गंभीर इशाऱ्यानंतर तरी जिल्हा प्रशासन आणि पोलीस विभाग या शेतकऱ्याला न्याय देणार की केवळ कागदी घोडे नाचवणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077